MHTH190019562022

**न्यायनिर्णय**
**(अधिघोषित दिनांक १५.०१.२०२५)**

खालील मुद्दे माझ्या निर्णयाकरीता उद्भवतात. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २९.०८.२०२२ रोजी १४.३० वाजता मौजे जितगांव, मानपाडा, तालुका तलासरी, जिल्हा पालघर येथे आरोपीने त्याच्या ताब्यात किंगफिशर स्ट्रॉग बिअरच्या प्रत्येकी ६५० मिलीच्या १३ बाटल्या व रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या ८ बाटल्या असा प्रोहिबिशन गुन्हयाचा माल बेकायदेशीरपणे ताब्यात बाळगुन त्याची विक्री करण्याचा अपराध केला ? | नाही |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ व २ करीता</u> –**

२. अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने तुलसीदास मुत्तप्पा कुंदन [सा.क्र.१] व केशव दत्तु भुरकुड [सा.क्र.२] यांना तपासले. आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ अंतर्गत नोंदवण्यात आले.

३. तुलसीदास मुत्तप्पा कुंदन [सा.क्र.१] यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक २९.०८.२०२२ रोजी निरीक्षक यांनी त्यांना राज्य उत्पादन शुल्क डहाणु येथे पंच म्हणुन पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत महेश साठे व निरीक्षक व इतर पोलीस स्टाफ होते. त्यानंतर ते सरकारी वाहनाने जितगांव, मानपाडा येथे गेले. तेथे साहेबांनी आरोपीची ओळख करून दिली. तेथे विविध ब्रान्डची दारू सापडली. दुय्यम निरीक्षक यांनी मुद्देमाल जप्त करून सीए प्रशिक्षणाकरीता नमुना काढला व लेबलवर त्यांची सही घेतली. १३ X ६५० किंगफिशर स्ट्रॉंग बिअरच्या बाटल्या व ८ X १८० रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या बाटल्या मिळुन आल्या. पोलीसांनी जप्ती पंचनामा नि १२ तयार केला. करून त्यावर त्यांची सही असुन मजकुर बरोबर आहे.दिनांक १३.०९.२०२२ रोजी पोलीसांनी त्यांच्यासमक्ष आरोपीस अटक पंचनामा नि. १३ प्रमाणे अटक केली. त्यांनी आरोपीला न्यायालयात ओळखले.

४. केशव दत्तु भुरकुड [सा.क्र.२] यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक २९.०८.२०२२ रोजी गुप्त बातमी मिळाली की, जितगांव, मानपाडा या ठिकाणी अवैध गावठी दारू विक्री करणाऱ्या गुत्यावर छापा टाकायचा आहे. त्यानंतर ते, सहकारी स्टाफ, पंच असे जितगांव, मानपाडा येथे अवैध परराज्यातील मद्य विक्री करणाऱ्यावर छापा टाकला असता त्यांना १३ X ६५० किंगफिशर स्ट्रॉंग बिअरच्या बाटल्या व ८ X १८० रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या बाटल्या मिळुन आल्या. त्यानंतर मुद्देमालातुन सीए प्रशिक्षणाकरीता एक बाटली वेगळी काढुन त्यास सिलबंद केले. पंचनामा निरीक्षक यांनी केला. त्यानंतर त्यांनी फिर्याद नि. १५ प्रमाणे दिली. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर गुन्हयातील मुद्देमाल ते सीए प्रशिक्षणाकरीता पत्र नि. १६ प्रमाणे घेवुन गेले. त्यांनी आरोपीला न्यायालयात ओळखले.

५. या प्रकरणात अभियोगपक्षाने दोन साक्षीदारास तपासले. तुलसीदास मुत्तप्पा कुंदन [सा.क्र.१] हे पंच आहेत व केशव दत्तु भुरकुड [सा.क्र.२] हे फिर्यादी आहेत. केशव दत्तु भुरकुड [सा.क्र.२] यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, दिनांक

२९.०८.२०२२ रोजी जितगांव, मानपाडा येथे अवैध परराज्यातील मद्य विक्री करणाऱ्यावर छापा टाकला असता त्यांना १३ X ६५० किंगफिशर स्ट्रॉंग बिअरच्या बाटल्या व ८ X १८० रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या बाटल्या मिळुन आल्या. या प्रकरणात जप्ती सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार तुलसीदास मुत्तप्पा कुंदन [सा.क्र.१] यांना तपासले. तुलसीदास मुत्तप्पा कुंदन [सा.क्र.१] यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, त्यांनी भरपुर प्रकरणामध्ये पंच म्हणुन काम पाहिलेले आहे. म्हणून घटनेच्या दिवशी आरोपीच्या ताब्यातुन प्रोहिबिशन गुन्हयाचा माल याबाबत शंका निर्माण होते. भरपुर संधी देवुनही रासायनिक विश्लेषण अहवाल अभियोगपक्ष पटलावर दाखल करण्यास असमर्थ ठरला. साक्षीदारांना गुप्त बातमी कोणी दिली त्याचे नांव त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले नाही. म्हणुन घटनेच्या दिवशी प्रोहिबिशन गुन्हयाचा माल बाळगतांना मिळुन आला याबाबत शंका निर्माण होते. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिले व मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत केला.

## आदेश

१. आरोपीस मुंबई दारु प्रतिबंधक कायदा कलम ६५(अ)(ई), ९८ व १०८ च्या शिक्षापात्र आरोपातुन फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५५(१) अंतर्गत निर्दोष मुक्तता केली.

२. आरोपीचे जामीनपत्रे व बंधपत्रे रद्द करण्यात आले.

३. अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल किंगफिशर स्ट्रॉंग बिअरच्या प्रत्येकी ६५० मिलीच्या १३ बाटल्या व रॉयल स्टॅग व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या ८ बाटल्या राज्य उत्पादन शुल्क विभाग, यांच्याकडे योग्य विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये चा वैयक्तीक मुचलका बंधपत्र पुरवावेत.

सही/–

(दि.म.गुलाटी)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, डहाणू.

डहाणु

दिनांक १५.०१.२०२५.